Collection

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, नरिमन पॉइंट, मुंबई -२१**

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/५५६ १२ एप्रिल, २०१२

**परिपत्रक क्र.१४७**

**विषय:** ग्रामीण व नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेंतर्गत खाजगी नळ जोडणीची कामे दर्जेदार होण्यासाठी अवलंबावयाची कार्यपध्दती व मार्गदर्शनपर सूचना.

**संदर्भ:** १) शासनाचा दि.२५.६.१० चा निर्णय क्र.नादव-२०१०/प्रक्र.२१९/पापु.२२.
२) शासनाचा दि.१४.१.११ चा निर्णय क्र.नादव-२०१०/प्रक्र.५०८/पापु.२२.
३) शासनाचा दि. १८.११.२०११ चा निर्णय क्र.ग्रापाधो-११११/प्र.क्र १५६/पापु-०७

**प्रस्तावना:**

राज्यातील नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांना खाजगी नळजोडण्या उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना, शासन निर्णय क्र. नादव २०१०/प्र.क्र.२१८/पापु.२२, दि. ५ जून, २०१० तसेच ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबांना खाजगी नळजोडण्या उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना, शासन निर्णय क्र.ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दि. १८ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहेत.

**खाजगी नळजोडणी :**

नागरी व ग्रामीण भागामध्ये राबविण्यात येणाऱ्या या दोन्ही योजनांतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांना प्रतिकुटुंब खाजगी नळ जोडणीसाठी प्रत्येक रु. ४०००/- इतके अनुदान मंजूर करण्यात येते. या अनुदानातुन खाजगी नळजोडणी देण्यासाठी पाईप लाईन, (एमपीडीई पाईप व फिटींग्स व जॉईन्टसह परिस्थितीनुरुप) जलमापक बसविणे, नळ बसविणे इ. कामे करावयाची आहेत.

**खाजगी नळजोडण्या देण्यात येत असलेली सद्यःस्थिती :**

या कार्यक्रमांतर्गत मंजूर दोन्ही योजनातुन खाजगी नळजोडण्या देताना योग्य तो दर्जा राखला जात नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास येत आहे. त्यामुळे कामाचा दर्जा खराब होऊन, सदर कार्यक्रम यशस्वीरित्या राबविला जाणार नाही.

त्यामुळे सदरची तांत्रिक दर्जाची कामे करण्यासाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शनपर सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. खाजगी नळजोडणी देताना पीव्हीसी/जीआय पाईप्स, फिटींग्स, जॉईन्ट्स न वापरता, उत्कृष्ट दर्जा असलेले व जी.आय. पाईप्सला पर्यायी पाईप्स म्हणून केंद्र शासनाने विशेष प्राधान्य दिलेले एम.डी.पी.ई.पाईप, अनुषंगिक फिटींग्स व जॉईन्ट्सचा वापर करावा. पाईप्सचा दर्जा ISO स्पेसिफिकेशन (ISO 4427 & BS 6730-1986) प्रमाणे व फिटींग्ससाठी ISO 14236-2000 त्याची तपासणी ISO 3959, ISO 3501 & ISO 3503 प्रमाणे असणे आवश्यक आहे.

२. सदरच्या पाईप हा १६ कि.ग्रॅ.क्षमतेचा व २० मि.मी. व्यासाचाच वापरावा. सर्वसाधारणपणे या पाईपांचा रंग हा निळा असून, जोडणीसाठी त्याची लांबी कमीत कमी १० मी. इतकी असावी.

३. ज्या वितरण व्यवस्थेवरुन सदरच्या जोडण्या द्यावयाच्या आहेत ती वितरण व्यवस्था ही सी.आय./डी.आय./पी.व्ही.सी.वा एच.डी.पी.ई. दर्जाच्या पाईपलाईनची असेल. अशा विविध दर्जाच्या वितरण व्यवस्थेवरुन जोडणी देताना नेमकी कोणत्या पध्दतीने द्यावी व ती कोणत्या पध्दतीच्या फिटींग्सचा वापर करुन द्यावी. याबाबतची पर्याय दर्शविणारी ड्रॉइंग्स फिटींग्ससह सोबत जोडली आहेत. त्यानुसार जोडणी करुन ग्राहक जोडणी द्यावी. या सर्वसाधारण बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

अ) जर वितरण व्यवस्था डी.आय/सी.आय दर्जाची असेल तर, नळ जोडणीसाठी क्लॅम्प सॅडल, एच.डी.पी.ई दर्जाची असेल तर इलेक्ट्रोफ्युजन टॅपिंग फेरुल, व जर पीव्हीसी दर्जाची असेल तर पी.व्ही.सी क्लॅम्प सॅडल वापरण्यात यावा.

ब) नळ जोडणीसाठी गन मेटल किंवा ब्रास रेग्युलेटिंग फेरुल बसविण्यात यावा.

क) नळ जोडणीसाठी Compression Female threaded adaptor with Metal Insert ( SS 304) आवश्यक आहे. सदर फिटींग गन मेटल फेरुलच्या मेटल थ्रेड आऊटलेट व एमडीपीई पाईप जोडण्यासाठी वापरण्यात यावे. प्रत्येक नळ जोडणीसाठी दोन Compression elbow आवश्यक आहेत.

ड) प्रत्येक नळ जोडणीसाठी Compression end and Femal threaded end सह युपीव्हीसी व्हॉल्व आवश्यक आहे. हा व्हॉल्व एमडीपीई पाईपवरती जलमापक बसविण्यासाठी वापरण्यात येतो.

इ) नळ जोडणीसाठी वापरावयाचे जलमापक हे EEC मार्कचे बसविणे आवश्यक राहील.

ई) नळ जोडणीसाठी एमडीपीई पाईप, फिटींग्स, जॉईन्ट्स व जलमापके बसविणे त्याशिवाय खोदाई, रोड क्रॉसिंग, कोबा फोडणे, संरक्षक भिंत फोडणे इ. कामासाठीचे दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रचलित दरसुचीनुसार घेण्यात यावे.

४. सर्व नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्राम पंचायतींना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी या योजनेंतर्गत खाजगी नळ जोडणीचे प्रस्ताव हे वरील कार्यपध्दतीनुसार एमपीडीई पाईप, फिटींग्स व जॉईंट्स इ. चा अवलंब करुन तयार करावेत.

५. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच जिल्हा परिषदांच्या सक्षम अभियंत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच प्राधिकरणांकडील ग्रामीण व नागरी भागात दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेंअंतर्गत खाजगी नळ जोडण्यांच्या नवीन प्रस्तावांना तांत्रिक मंजुरी देताना, सदर प्रस्ताव हे या परिपत्रकातील तरतुदीनुसार असल्याची दक्षता घ्यावी.

६. यापुर्वी मंजूर झालेल्या खाजगी नळ जोडण्यांच्या प्रस्तावाच्या कामासाठी निविदा काढताना त्या उपरोक्त नमूद मार्गदर्शपर सुचनांनुसार/तरतुदी असल्याची दक्षता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी घ्यावी.


सोबत: ३ ड्रॉईंग्स

(राधेश्याम मोपलवार) भाप्रसे
सदस्य सचिव

प्रत :


१. मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी.
२. सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४. संचालक, पाणी स्वच्छता व सहाय्य संस्था (WSSO), नवी मुंबई.
५. मुख्य अभियंता,नागरी व ग्रामीण योजना/जलव्यवस्थापन, मजीप्रा, कोपरी, ठाणे.
६. मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, मजीप्रा, पुणे
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य व वित्त अधिकारी
८. सर्व अध्यक्ष/मुख्याधिकारी, नगरपरिषदा
९. सर्व अधिक्षक अभियंता, (नागरी व ग्रामीण योजना), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१०. अधिक्षक अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई
११. सर्व कार्यकारी अभियंता, (नागरी व ग्रामीण योजना), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१२. सर्व कार्यकारी अभियंता, जलव्यवस्थापन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१३. सर्व कार्यकारी अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१४. सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद

## HSC for PVC mains with Ferrule PVC Saddle. ( PVC/003 )





| S.No | Part.No | Description |
|---|---|---|
| 1 | A | PVC Main |
| 2 | B | PP Compression Metal Insert Female Thread Adapter |
| 3 | C | PP Comp elbow(Both side Comp.End) |
| 4 | D | UPVC Ball valve with compression/female joint |
| 5 | E | MDPE Pipe |
| 6 | F | PVC saddle clamp |
| 7 | G | Regulating Ferrule |

# HSC for HDPE mains with Ferrule .(HDPE/00[illegible] )




| S.No | Part.No | Description |
|---|---|---|
| 1 | A | HPDE Main |
| 2 | B | PP Compression Metal Insert Female Threaded Adaptor |
| 3 | C | PP Comp elbow ( Both side Comp.End) |
| 4 | D | UPVC Ball valve with compression/female joint |
| 5 | E | MDPE Pipe |
| 6 | F | PE80 Electro Fusion Tapping saddle with female threaded outlet |
| 7 | G | Regulating Ferrule |

## HSC for DI mains with Ferrule .
## ( DI/006)




| S.No | Part.No | Description |
|---|---|---|
| 1 | A | DI Main Pipe |
| 2 | B | PP Compression Metal Insert Female Threaded Adaptor |
| 3 | C | PP Comp elbow ( Both side Comp.End) |
| 4 | D | UPVC Ball valve with compression/female joint |
| 5 | F | MDPE Pipe |
| 6 | G | Strap Saddle-SS304 |
| 7 | H | Regulating Ferrule |